दै प्रजावाणी

# सोडत एका जागेची, परिणाम ७ जागां



## ■ हनुमानगडात अखेर खुल्या प्रवर्गाला जागा

## ■ ओबीसीची जागा महिलेसाठी राखीव

नांदेड,दि.१०: हनुमानगड प्रभागातील ओबीसी महिलेला थेट जागा राखून ठेवण्याऐवजी ती जागा ओबीसीला गेल्यामुळे झालेल्या गोंधळानंतर सोमवारी (दि.१०) पुन्हा सोडत काढण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव करावयाच्या ११ पैकी १० जागा थेट देण्याचे आदेश देऊन अकराव्या जागेसाठी ११ प्रभागातून नव्याने सोडत काढण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आजची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या सोडतीमुळे चार प्रभागातील ७ जागेवर परिणाम झाला असून तेथील जागांची अदलाबदल झाली आहे.

गेल्या गुरूवारी (दि.६) झालेल्या सोडतीत ओबीसीचे आरक्षण चुकल्यामुळे नव्याने सोडत घेण्याचे आदेश आयोगाने दिले होते. या आदेशातच कोणत्या जागा ओबीसी महिलेसाठी सोडावयाच्या आणि कोणत्या जागेतून ओबीसी महिलांसाठी चिठ्ठी टाकून सोडत काढायची याबद्दल स्पष्ट निर्देश दिले होते. त्यामुळे पुर्वीचे ओबीसी आरक्षण रद्द करून सोमवारी त्याचा तपशील नव्याने जाहीर करण्यात आला.

कळीचा मुद्दा बनलेल्या हनुमानगड प्रभाग ४ मधील जागा 'क' ही ओबीसी महिलेला तर जागा 'ड' ही बिगरराखीव महिलेऐवजी बिगरराखीव प्रवर्गासाठी सुटली आहे.. प्रत्येक प्रभागात किमान एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटली पाहिजे, असे आयोगाचे अप्रत्यक्ष संकेत असल्याचे मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी यावेळी सांगितले. विविध प्रभागातील दहा जागा थेट दिल्यानंतर उर्वरित दहा प्रभागातील ११ जागेतून ।पान २ वर

### आक्षेपांचा पाऊस सुरू

प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणावर हरकती व सूचना देण्यासाठी इच्छुक असलेल्यांना ११ ते १९ जुलै यादरम्यान मनपा आयुक्तांसह चारही क्षेत्रिय कार्यालयात लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवता येणार आहेत. दुसऱ्यांदा झालेल्या आरक्षणामुळे तसेच प्रभागाची फोड करण्यावरून आक्षेपांचा पाऊस मंगळवारपासून सुरू होणार आहे.

### चार प्रभागांत सर्वसाधारण महिलांच्या प्रत्येकी २ जागा

उमर कॉलनी-प्रभाग-१२, होळी प्रभाग-१४, गाडीपुरा प्रभाग-१६ व वजिराबाद प्रभाग-१७ या चारही प्रभागातील 'ब' व 'क' या दोन्ही जागा खुल्या प्रवर्गाच्या महिलेसाठी आरक्षित झाले आहे. विशेष म्हणजे या चारही प्रभागातील 'अ' क्रमांकाची जागा ओबीसी आणि 'ड' क्रमांकाची जागा सर्वसाधारणसाठी सुटल्याने या सर्वांचे आरक्षण एकसारखेच झाले आहे.

### तीन प्रभागात सर्वसाधारण महिलेला थेट संधी नाही

हनुमानगड-४, चौफाळा प्रभाग-१३ व वसरणी/कौठा प्रभाग-१९ या तिन्ही प्रभागात खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी एकही जागा आरक्षित नाही. त्यामुळे या तिन्ही प्रभागात इच्छुक महिलांना सर्वसाधारण जागेवरून निवडणूक लढवावी लागणार आहे.

### चौफाळ्यात दोन 'ओपन'

सोमवारी जाहीर झालेल्या आरक्षणादरम्यान ओबीसी महिलेची जागा सोडतीने निश्चित झालेल्या चौफाळा प्रभागात चारपैकी २ जागा खुल्या प्रवर्गासाठी सुटल्या आहेत.

### महापौ... हक्काची ...

महापौर सौ. ... यांचे पती व ... माजी सभापत... यांच्यासाठी पु... ओबीसीसाठी ... हनुमानगड प्र... 'क' सुरक्षित ... होती. सर्वसाध... प्रवर्गात स्पध... निवडून येण... जास्त असल्य... दावा निश्चित ... होता. परंतु फे... जागा ओबीसी ... राखीव केल्य... स्वामी यांना ... प्रवर्गासाठी ... लागणार आहे. अगोदरच माजी ... काँग्रेसचे विद्यम... आनंद चव... नामनिर्देशित ... विश्वास कद... प्रबळ दावेदार ... जागेवर दाव... स्वामींना खूप ... करावी लागणार